दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | मंगळवार, 11 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 94 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

# शेकडो शेतकरी, शेतमजूर,कामगारांना अटक व सुटका दखल न घेतल्यास कृषि मंत्र्याच्या घरावर धडकणार





■ परळी / प्रतिनिधी

केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी, शेतमजूर आणि कामगार विरोधी धोरणांचा निषेध करण्यासाठी तसेच प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी सीटू (CITU), शेतमजूर युनियन आणि अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने जिल्ह्यात जोरदार 'जेलभरो' आंदोलन करण्यात आले. परळी तालुक्यातील सिरसाळा या ठिकाणी या आंदोलनात शेकडो श्रमिक सहभागी झाले.

शेतकऱ्यांच्या हितासाठी मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेला 17500 रुपयांचा पीक विमा तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा, पीक विमा योजनेतील शेतकरी हिताचे ट्रिगर पूर्ववत लागू करावेत आणि नियमित कर्ज भरणार्या शेतकऱ्यांना 2 लाख रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान द्यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. यासोबतच भारत आणि अमेरिका यांच्यातील शेतकरी व कामगारांवर थेट प्रतिकूल परिणाम करणारा करार रद्द करावा, केंद्रातील व राज्यातील सरकारच्या जनविरोधी धोरणांमुळे सर्वसामान्यांचे प्रश्न बिकट झाले असून, खाजगीकरण व कंत्राटी पद्धतीमुळे बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. कॉर्पोरेट धार्जिण्या धोरणांमुळे कायमस्वरूपी नोकरीच्या संधी संपवल्या जात आहेत. या सरकारी धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करून प्रशासनाला मागण्यांचे सविस्तर निवेदन सुपूर्द केले.

या निवेदनाद्वारे नव्याने लादण्यात आलेल्या चारही कामगार संहिता तात्काळ रद्द करण्याची आणि असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा लागू करण्याची मागणी करण्यात आली. तसेच आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका आणि शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना कंत्राटी पद्धतीतून मुक्त करून त्यांना शासकीय सेवेत कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा आणि किमान 30 हजार रुपये वेतन लागू करावे, अशी मागणी मांडण्यात आली. रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून वर्षाला 200 दिवस काम, ऊसतोडणी व वाहतूक कामगारांचा 2026-29 या तीन वर्षांचा त्रिपक्षीय करार गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वीच तात्काळ करावा, लोकनेते गोपीनाथ मुंडे

■ रास्ता रोको प्रसंगी महिलांचा लक्षणीय सहभाग
■ रास्ता रोको केल्याने राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक विस्कळीत.
■ सिरसाळा पोलिसाकडून अटक व सुटका

ऊसतोडणी महामंडळाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, सक्तीचे 'स्मार्ट मीटर' बसवणे बंद करून वाढीव वीज बिल लोडनुसार दुरुस्त करावे आणि सिरसाळा येथील निवासी गायरान व भोगवटाधारकांना मालकी हक्काचा PTR द्यावा, या मुद्द्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. शासनाने या सर्व रास्त मागण्यांची तात्काळ दखल घेऊन योग्य निर्णय न घेतल्यास कृषि मंत्र्यांच्या च्या घरा समोर बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल , असा थेट इशारा

या वेळी किसान सभा, सिटू संघटना, शेतमजूर युनियन आदी संघटनांच्या कॉ.ऑड.अजय बुरांडे, कॉ.बी.जी.खाडे, कॉ.सुदाम शिंदे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, कॉ.प्रकाश उजगरे, कॉ.भगवान बडे, कॉ.किरण सावजी, कॉ.रमेश पांचाळ, आशा वर्कर्स चाटे मॅडम, कॉ.पी.एस.नागरगोजे, कॉ.पी. एस.घाडगे, कॉ.पांडुरंग राठोड, कॉ.गंगाधर पोटभरे, कॉ.बळीराम देशमुख,कॉ.विष्णू देशमुख, कॉ.मदन वाघमारे आदी पदाधिकारी यांनी दिला.

## परळीच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या भूमीपूजन तारखेत बदल ; भूमीपूजन आता 14 ऐवजी 15 ऑगस्टला

■ मुंबई वृत्तसंस्था

५६५ कोटी रूपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीच्या भूमीपूजन कार्यक्रमाच्या तारखेत बदल झाला असून आता हे भूमीपूजन १४ ऐवजी १५ ऑगस्ट रोजी होणार आहे अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे.

१५ ऑगस्ट रोजी दुपारी २ वा. उप मुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना.सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते आणि पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण पोलीस ठाण्याजवळ असलेल्या टेकडीवरील मैदानात हा भूमीपूजन कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाची प्रशासनाकडून सध्या तयारी सुरू झाली आहे. बीड येथे शासकीय ध्वजारोहण झाल्यानंतर उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि जालना येथील ध्वजारोहण आटोपून ना. पंकजाताई मुंडे परळीत येणार आहेत. प्रशासनाने तारखेतील बदलाची नोंद घेत कार्यक्रमाची तयारी सुरू केली आहे.



## केज पोलीस स्टेशन ची जुगार खेळणाऱ्यावर कारवाई 1,28,200/- हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ केज /प्रतिनिधी

दिनांक 10/08/2026 रोजी पोलीस निरीक्षक श्री. राहुल सुर्यतळ यांना गोपनिय माहिती मिळाली की, मौजे उंबरी गावातील ओमकार किराणा नावाचे पत्राचे शेड मध्ये काही ईसम हार जित वर तिर्रट नावाचा जुगार पत्त्याच्या पानावर पैसे लावुन खेळत आहेत. पोलीस निरीक्षक साहेब यांचे आदेशाने सहा. पोलीस निरीक्षक लक्ष्मण उंबरे, गेड पोउपनि इनामदार, पोह/ बाळासाहेब अहंकारे, पोअं/नितीन वारे, पोअं/ दादाराव देवगुडे, पोअं/शिवाजी कागदे यांनी मौजे उंबरी गावातील ओमकार किराणा नावाचे पत्राचे शेडमध्ये अचानक जावुन 15.40 वाजता छापा मारला असता सदर छाप्यामध्ये हार जित वर तिर्रट नावाचा जुगार पत्त्याच्या पानावर पैसे लावुन खेळत असतांना 01. अंकुश माणीक जाधव



02. अविनाश गंगाराम मुळे 03. प्रदीप दिलीप पवार 04.ज्ञ गानोबा गोकुळ भैरट 05. राजाभाऊ संपत मुळे 06. नवनाथ तुळशीराम शिंपले सर्व. रा.उमरी, ता. केज, 07. बादल विठ्ठल पवार रा.शाम नगर लातुर जि. लातुर, 08 दिनु अभिमान कसबे रा.उमरीता. केज असे आरोपी मिळुन आले व एक आरोपी राजाभाऊ अंगद भैरट रा.उमरी हा पोलीस पार्टीस पाहुन पळुन गेला आहे.

## संभाजीनगर येथे भाजपाची तिरंगा रॅली; जिल्ह्यातून दोन हजार कार्यकर्तै जाणार

### भाजयुमोच्या नियोजन बैठकीत जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड यांची माहिती

■ लातूर प्रतिनिधी

राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत संभाजीनगर येथे १४ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या भाजपाच्या भव्य तिरंगा यात्रेत लातूर ग्रामीण जिल्ह्यातील दोन हजाराहून अधिक भारतीय जनता युवा मोर्चाचे कार्यकर्ते सहभागी होणार असल्याची माहिती भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी दिली.

विश्वनेते देशाचे लोकप्रिय प्रधानमंत्री माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांनी स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर हर घर तिरंगा अभियान देशभर यशस्वी करण्याचे आवाहन केले या अभियानानुसार संभाजीनगर येथे येत्या १४ ऑगस्ट रोजी भारतीय जनता पार्टीच्या वतीने मराठवाडा विभागाची भव्य तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली असून रॅलीत लातूर जिल्ह्याचा मोठा सहभाग असावा यासाठी भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भारतीय जनता युवा मोर्चा ग्रामीण जिल्ह्याची नियोजन बैठक संपन्न झाली. या बैठकीस भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस रामानंद मुंडे, संजय ठाकूर, सचिन अनसरवाडे, रामेश्वर कलबुर्गे, जिल्हा उपाध्यक्ष रमेश पाटील, रामेश्वर चावरे, भागवत गुट्टे यांच्यासह जिल्हा व मंडल पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीत बोलताना भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड यांनी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. बसवराज पाटील,




माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, आ. रमेशआप्पा कराड, आ. अभिमन्यू पवार आणि जिल्ह्यातील मान्यवर नेत्यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील भारतीय जनता युवा मोर्चाचे दोन हजाराहून अधिक कार्यकर्ते अडीचशे ते तीनशे वाहनातून छत्रपती संभाजी नगर येथील भाजपाच्या तिरंगा रॅलीत सहभागी होतील त्या अनुषंगाने जय्यत तयारी करण्यात येत आहे.

संभाजीनगर येथील भाजपाच्या तिरंगा रॅलीची सविस्तर माहिती देऊन लातूर ग्रामीण जिल्ह्यातून युवा मोर्चाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी अधिकाधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करून ऋषिकेशदादा कराड यांनी लातूर जिल्ह्यातून वाजत गाजत मोठ्या उत्साहाच्या वातावरणात युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी रॅलीत सहभागी व्हावे असे सांगून वाहनाची व्यवस्था यासह इतर अनेक मौलिक सूचना केल्या.

या बैठकीस लातूर ग्रामीण जिल्ह्यातील भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रशांत शिंदे, किरण मुंडे, अमर चव्हाण, नरेश चपटे, महादेव गुरुशेट्टे, मारुती टिपे, आकाश पाटील, नितीन कवठाळे, बजरंग मरे, बाळासाहेब पाटील, पवन बिरादार, सागर मुरुडकर, सदानंद पाटील, गणेश मोहिते, शरद पांचाळ, विकास पाटील, वामन मुळे ओमप्रकाश गरड, प्रशांत बिडवे, साधूराम कांबळे, विशाल माळी, अक्षय भोसले, मुकुंद केसरी, मेघराज जाधव, उद्धव जाधव यांच्यासह जिल्हा कार्यकारिणी मंडल कार्यकारणीतील पदाधिकारी उपस्थित होते.

# मराठवाड्यात पिकांना नवसंजीवनी

मराठवाड्यात समाधानकारक सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. जायकवाडी धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढल्याने पिण्याच्या पाण्याबरोबरच सिंचनाचीही चिंता कमी झाली आहे. पावसामुळे पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर तसेच जालना जिल्ह्यातील तीनशे गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या जायकवाडी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. जायकवाडी धरण ६७.९९ टक्के भरले असून पावसाचा जोर आणखी कायम राहिल्यास भविष्यात पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. नाशिक जिल्ह्यासह गोदावरी नदीच्या वरील भागातील पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाला. त्यामुळे हजारो गावांसाठी लाभदायक असलेल्या जायकवाडी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. मागील महिन्याभरात झालेल्या पावसामुळे जायकवाडी धरणात २५ टीएमसी पाण्याची भर पडली आहे. मान्सूनच्या सुरुवातीला जायकवाडी धरणातील पाणीसाठा संपल्यात जमा होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात चिंता व्यक्त केली जात होती; परंतु जुलै महिन्यात नाशिकसह गोदावरीच्या वरील पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे जायकवाडी धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाली. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात हलका व मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू असल्यामुळे पिकांना देखील नवसंजीवनी मिळाली आहे. मध्यंतरीच्या काळात मराठवाड्यातील काही जिल्ह्यात पाऊस गायब झाल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती.

पाऊस नसल्यामुळे शेतकरी चिंतेत होते. गेल्या आठ दिवसांपासून छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोली, परभणी, नांदेड, धाराशिव, लातूर या जिल्ह्यात समाधानकारक पाऊस सुरू आहे. अलीकडच्या पावसामुळे मराठवाड्यातील पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवात जीव आला आहे. मराठवाड्यात येत्या दोन दिवसांत जोरदार पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात २४ तासांत ८९ मंडळात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद झाली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ३७, जालना जिल्ह्यातील २४ आणि बीड जिल्ह्यातील २८ मंडळांचा यामध्ये समावेश आहे. या तीन जिल्ह्यांत पावसाचा जोर कमी असल्याने आगामी काळातील पर्जन्यमानावर धरणांमध्ये जमणारा जलसाठा आणि पाणीसाठ्याचे भवितव्य अवलंबून आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील भावसिंगपुरा, बालानगर, लोहगाव, पाचोड, विहामांडवा, गाजगाव, आसेगाव, सिद्धनाथ, वडगाव, करंजखेड, नाचनवेल, जरंडी, बनोटी या ठिकाणी दहा मिलिमीटर पेक्षा अधिकचा पाऊस झाला, तर बीड जिल्ह्यातील पिंपळनेर, गेवराई, धोंडराई, गंगामसला, नांदुर घाट, हनुमंत पिंपरी, केज, नागापूर या ठिकाणी देखील जवळपास १५ मिलिमीटरपेक्षा अधिकचा पाऊस झाला. त्यापैकी नांदूरघाट येथे सर्वाधिक ३० मिलिमीटर पाऊस झाल्याची नोंद आहे. जालना जिल्ह्यात भोकरदन तालुक्यात ४.२ तसेच जाफराबाद ३.९, जालना २.२, अंबड ४.८, परतुर २.८, बदनापूर १.६, घनसांगवी ३.८ आणि मंठा ०.९ मिलिमीटर पाऊस गेल्या २४ तासांत झाला. जायकवाडी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाल्याने छत्रपती संभाजीनगर तसेच जालना जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची गरज भागली जाणार आहे. याबरोबरच या धरणातून जवळपास ३०० गावांना पाणीपुरवठा होतो. तसेच औद्योगिक वापरासाठी वर्षभर पुरेल एवढा पाणीसाठा सध्या जायकवाडी धरणात उपलब्ध झाला आहे.

नांदेड, परभणी, हिंगोली या तीन जिल्ह्यांत गेल्या दोन दिवसांपासून मोठा पाऊस सुरू आहे. त्यामुळे शेतकरी देखील समाधानी आहेत. पिकांना जीवदान मिळाल्यामुळे दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर येणार नाही हे मात्र निश्चित आहे. लातूर तसेच धाराशिव जिल्ह्यातही चांगला पाऊस सुरू आहे. एकंदरीत मराठवाड्यातील पिकांची परिस्थिती समाधानकारक मानली जात आहे. शेतकरी समाधानी असून खरीप हंगामासाठी सिंचनाची उपलब्धता आणि पिण्याच्या पाण्याची भविष्यातील गरज लक्षात घेता पाण्याची आवक वाढल्यास संपूर्ण मराठवाड्याची चिंता मात्र नक्कीच मिटणार आहे.

संपूर्ण मराठवाड्यात येत्या दोन दिवसांत मुसळधार पाऊस पडणार आहे. नांदेड व लातूर जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे, तर हिंगोली, परभणी, जालना, बीड, धाराशिव या जिल्ह्यात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. शुक्रवार आणि शनिवारपर्यंत नांदेड, लातूर, बीड जिल्ह्यांत विजांसह वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मान्सूनच्या सुरुवातीला मराठवाड्यातील पिकांबद्दल चिंता व्यक्त केली जात होती. शेतकऱ्यांचे संपूर्ण आयुष्यमान शेती आणि पिकांवर अवलंबून असते. निसर्गाने कृपा केली तर शेतकरी ताठ मानेने जगू शकतो; परंतु निसर्गाची अवकृपा झाली तर शेतकऱ्यांच्या हातातील पिके निघून जातात. त्यामुळे संपूर्ण बाजारपेठेवर त्याचा परिणाम होतो. अलीकडच्या वातावरणामुळे तसेच पावसामुळे मराठवाड्यातील पिके तरारली आहेत. सध्याच्या परिस्थितीला तरी पिकांसाठी आवश्यक असलेला पाऊस पडलेला असल्यामुळे मराठवाड्यातील शेतकरी समाधानी आहे. पावसामुळे पिकांना जीवदान तर मिळाले पण आणखी मोठा पाऊस झाला तर मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पूर्णपणे मिटणार आहे. तसेच जनावरांसाठी लागणाऱ्या पाण्याचा प्रश्नही भविष्यातील पावसामुळे सुटू शकतो.



# हिमालयातलं पांढरं आच्छादन

**हिमाचल प्रदेशातील डोंगररांगांकडे पाहताना हिमालयावर जून महिन्यातच बर्फवृष्टी झाल्याचे आढळते. मात्र, हा बर्फ नसतो तर सफरचंद बागांवर पसरवण्यात आलेल्या हजारो एकरांवरील पांढऱ्या 'अँटी-हेल नेट्स' असतात. ओलावृष्टीतून पिकांचे संरक्षण करण्यासाठी उभारलेल्या या जाळ्यांनी घडवलेला हा बदल केवळ रंगाचा नसून हवामानबदल, शेती, अर्थकारण आणि पर्यावरण यांच्या गुंतागुंतीच्या नात्याची कहाणी सांगतो.**



एके काळी हिमाचलच्या डोंगरांची ओळख हिरव्यागार सफरचंद बागा, देवदाराची दाट जंगले आणि नैसर्गिक सौंदर्य अशी होती. आज त्या जागी प्लास्टिकच्या पांढऱ्या जाळ्यांनी व्यापलेले डोंगर दिसतात. हे दृश्य विकासाचे प्रतीक मानायचे की पर्यावरणीय संकटाचे, हा प्रश्न आता गंभीरपणे विचारण्याची वेळ आली आहे. कारण ही जाळी शेतकऱ्यांची हौस नाही, तर त्यांच्या अस्तित्वाची गरज बनली आहे. हवामानबदलाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसतो. हिमाचलमधील सफरचंद उत्पादक गेल्या दीड दशकापासून बदलत्या हवामानाचा प्रत्यक्ष अनुभव घेत आहेत. पूर्वी विशिष्ट भागांपुरती मर्यादित असलेली गारपीट आता जवळपास सर्वच उंचीच्या भागांमध्ये होत आहे. कधीही, कोणत्याही वेळी पडणारे गारांचे तडाखे काही मिनिटांमध्ये वर्षभराची मेहनत उद्ध्वस्त करतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांकडे पर्याय काय? पिके नष्ट होताना पाहायची की ती वाचवण्यासाठी उपलब्ध तंत्रज्ञानाचा आधार घ्यायचा? त्यांनी दुसरा पर्याय निवडला, म्हणूनच 'अँटी-हेल नेट्स'चा वापर झपाट्याने वाढला. आज हिमाचलची पाच हजार कोटी रुपयांची सफरचंद अर्थव्यवस्था आणि त्यावर अवलंबून असलेले दहा लाखांहून अधिक लोक या जाळ्यांवर अवलंबून आहेत. अनेक शेतकरी लाखो रुपये खर्च करून ही जाळी विकत घेत आहेत. कारण गारपिटीमुळे ६० ते ७० टक्के उत्पादन एका क्षणात नष्ट होऊ शकते. या तुलनेत जाळ्यांचा खर्च त्यांना परवडणारा वाटतो. त्यामुळे 'अँटी-हेल नेट्स' हे हवामान बदलाविरुद्धचे संरक्षण कवच बनले आहे; परंतु प्रत्येक संरक्षण कवचाची एक किंमत असते. ही किंमत केवळ आर्थिक नाही, तर पर्यावरणीयही असते.

'अँटी-हेल नेट्स'मुळे फळांचे संरक्षण होते. उत्पादन वाढते, तापमान किंचित कमी राहते आणि जमिनीतील ओलावा टिकून राहतो, असे संशोधन सांगते. नौणी येथील डॉ. वाय. एस. परमार बागायती विद्यापीठाच्या अभ्यासानुसार नेटखालील तापमान कमी होते. प्रकाशाचे प्रमाण घटते. मातीतील आर्द्रता वाढते आणि उत्पादनातही वाढ दिसून येते. म्हणजेच शेतकऱ्यांच्या दृष्टीने हे तंत्रज्ञान उपयुक्त आहे; मात्र याच अभ्यासाचा दुसरा पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. हजारो हेक्टर क्षेत्र जाळ्यांनी झाकले गेले, तर त्या संपूर्ण परिसराचे सूक्ष्म हवामान बदलते. वाऱ्याचा वेग कमी होतो, आर्द्रता वाढते, सूर्यप्रकाश कमी पोहोचतो. याचा परिणाम केवळ सफरचंदाच्या झाडांवरच होत नाही, तर त्या परिसरातील संपूर्ण जैवविविधतेवर होऊ शकतो. परागीभवन करणारे कीटक, फुलपाखरे, जंगली मधमाश्या, पक्षी आणि इतर सूक्ष्म जीव यांच्या हालचालींवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. सफरचंद उत्पादनासाठी केवळ पाळीव मधमाश्याच महत्त्वाच्या नसतात. नैसर्गिक परागीभवन करणारे असंख्य कीटक या प्रक्रियेत सहभागी असतात. हजारो हेक्टरवर पसरलेल्या जाळ्या त्यांच्या नैसर्गिक उड्डाणमार्गात अडथळा ठरत असतील, तर त्याचे दीर्घकालीन परिणाम काय असतील, याचे उत्तर अद्याप कोणाकडे नाही. विज्ञानाने हा प्रश्न अजून पूर्णपणे अभ्यासलेलाच नाही. हवामानबदलाचा आणखी एक परिणाम म्हणजे सफरचंद लागवडीची बदलती भौगोलिक सीमा. काही दशकांपूर्वी १२०० ते १५०० मीटर उंचीवर मोठ्या प्रमाणात सफरचंदांची लागवड होत होती. आज ती तीन हजार मीटरपेक्षा अधिक उंच भागांकडे सरकत आहे. कारण कमी उंचीच्या भागात आवश्यक तेवढा थंडावा उरत नाही. सफरचंदाला आवश्यक असलेले 'चिलिंग अवर्स' कमी होत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना केवळ तंत्रज्ञान बदलावे लागत नाही, तर संपूर्ण शेतीचे भूगोल बदलावे लागत आहे. याच काळात उच्च घनतेच्या (हाय डेन्सिटी) सफरचंद बागायतीचा प्रसारही वाढला आहे. या पद्धतीसाठी डोंगरांचे उतार समतल केले जात आहेत. मोठ्या प्रमाणात खोदकाम, समतलीकरण आणि कृत्रिम संरचना उभारल्या जात आहेत. परिणामी, डोंगरांची नैसर्गिक जलनिस्सारण व्यवस्था बदलत आहे. मातीची धूप, भूस्खलन आणि जलसाठ्यांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. हवामानबदलामुळे निर्माण झालेल्या संकटाला तोंड देताना आपण नकळत नवीन संकटांना आमंत्रण देत नाही ना, हा प्रश्न यामुळे अधिक गंभीर बनतो. या संपूर्ण चर्चेतील सर्वात दुर्लक्षित मुद्दा म्हणजे प्लास्टिक. 'अँटी-हेल नेट्स' या शेवटी प्लास्टिकच्याच जाळ्या आहेत. त्यांचे आयुष्य साधारण सात ते दहा वर्षे असते. त्यानंतर त्या बदलाव्या लागतात. हिमाचलमधील हजारो हेक्टर क्षेत्रावर पसरलेल्या या जाळ्यांमधून पुढील दशकात किती हजार टन प्लास्टिक कचरा निर्माण होईल, याचा कोणताही अधिकृत अंदाज उपलब्ध नाही. त्याहून महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या जुन्या जाळ्यांचे काय होणार? त्यांचा पुनर्वापर होणार का? त्यांचे पुनर्चक्रण होणार की त्या जाळ्या डोंगरउतारांवर, नद्यांमध्ये किंवा लँडफिलमध्ये जाऊन आणखी एक पर्यावरणीय संकट निर्माण करणार?

जागतिक स्तरावर कृषी क्षेत्रातील प्लास्टिक वापराबाबत चिंता वाढत आहे. प्लास्टिक सूर्यप्रकाश, पाऊस आणि तापमानाच्या परिणामामुळे सूक्ष्म कणांमध्ये विघटित होते. हे मायक्रो प्लास्टिक माती, पाणी आणि अखेरीस अन्नसाखळीत प्रवेश करते. हिमालयासारख्या संवेदनशील परिसंस्थेत हा धोका अधिक गंभीर ठरू शकतो. आज त्याबाबत पुरेसे संशोधन नसले, तरी भविष्यात ही समस्या मोठे स्वरूप धारण करू शकते. याचा अर्थ 'अँटी-हेल नेट्स'चा वापर चुकीचा आहे का? अजिबात नाही. उलट, सध्याच्या परिस्थितीत ते शेतकऱ्यांसाठी अपरिहार्य झाले आहे. प्रश्न जाळ्यांच्या वापराचा नाही, तर त्याला पर्याय शोधण्याचा आहे. गारपीट प्रतिबंधक तोफा, क्लाउड सीडिंग, अधिक सक्षम हवामान अंदाज प्रणाली, हवामान अनुकूल वाण, जैवविघटनशील संरक्षक साहित्य आणि वैज्ञानिक कचरा व्यवस्थापन यांसारख्या पर्यायांवर आता गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. हवामानबदलाशी लढताना केवळ एका तात्पुरत्या उपायावर अवलंबून राहणे शाश्वत ठरू शकत नाही. सरकारची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. आतापर्यंत 'अँटी-हेल नेट्स'च्या खरेदीवर अनुदान, बागायतीला प्रोत्साहन आणि उत्पादनवाढ यावर भर देण्यात आला; परंतु या जाळ्यांच्या पर्यावरणीय परिणामांचे दीर्घकालीन संशोधन, त्यांच्या विल्हेवाटीची व्यवस्था आणि जैवविविधतेवरील परिणामांचा अभ्यास यासाठीही तितकीच गंभीर धोरणात्मक तयारी आवश्यक आहे. हवामानबदलाशी लढताना पर्यावरणाचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेणे ही शासनाची जबाबदारी आहे.

हिमालय हा केवळ डोंगरांचा प्रदेश नाही, तर भारताच्या जलसुरक्षेचा, जैवविविधतेचा आणि पर्यावरणीय समतोलाचा आधार आहे. त्या हिमालयाचा रंग आज बदलत आहे. एके काळी बर्फामुळे पांढरे दिसणारे डोंगर आता प्लास्टिकच्या जाळ्यांमुळे पांढरे दिसत आहेत. हा बदल केवळ दृश्य नाही, तर आपल्या विकासाच्या मॉडेलबद्दल प्रश्न विचारणारा आहे. हवामानबदल आता भविष्यकाळातील इशारा राहिलेला नाही. तो आज शेतकऱ्यांच्या निर्णयांमध्ये, पिकांच्या पद्धतीत, डोंगरांच्या रंगात आणि पर्यावरणाच्या बदलत्या स्वरूपात स्पष्टपणे दिसत आहे. 'अँटी-हेल नेट्स' ही त्या बदलाची सर्वाधिक दृश्यमान खूण आहे. त्यांनी शेतकऱ्यांची पिके वाचवली आहेत; पण त्याच वेळी त्यांनी आपल्यासमोर एक मोठा प्रश्न उभा केला आहे, हवामानबदलाशी लढताना आपण निसर्गाला आणखी कृत्रिम बनवत आहोत का? या प्रश्नाचे उत्तर आज कोणाकडे नाही; मात्र एक गोष्ट निश्चित आहे. हिमालयाचा रंग बदलत आहे आणि त्या बदलामागे केवळ निसर्ग नाही, तर माणसाने हवामानबदलाशी सामना करण्यासाठी निवडलेले उपायही तितकेच जबाबदार आहेत. म्हणूनच आता केवळ उत्पादन वाढवण्यापेक्षा पर्यावरण, शेती आणि शाश्वत विकास यांच्यातील समतोल साधणारी नवी दृष्टी विकसित करणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे. हिमालय वाचवायचा असेल, तर त्याच्या रंगाबरोबरच त्याचा स्वभावही जपावा लागेल.

# अधांतरी हे झुले नभांगण...



एखाद्या मराठी कवीच्या फक्त एका गाण्याच्या गौरवार्थ दरवर्षी एखादा पुरस्कार देण्यात येतो हे कुणाला खरे वाटेल का? अर्थात ठाण्याबाहेरच्या कुणाला बरं का? कारण असा 'गंगा जमुना' नावाचा अद्वितीय पुरस्कार ठाणे महापालिका आणि 'जनकवी पी. सावळाराम कला समिती' यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी दिला जातो हे ठाणेकरांना माहीत आहे. कविवर्य निवृत्तीनाथ रावजी पाटील ऊर्फ पी. सावळाराम यांनी लिहिलेल्या वसंत प्रभूंनी संगीत दिलेल्या लतादीदींच्या आवाजातल्या भावगीताच्या गौरवार्थ हा पुरस्कार दिला जातो. अनेक पिढ्यांच्या मनात अजरामर झालेल्या त्या गाण्याचे शब्द होते, 'गंगा जमुना डोळ्यात उभ्या का? जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी रहा.' या गाण्यात त्यांनी चितारलेले भारतीय कुटुंबसंस्थेच्या प्रेममय नात्यांचे दर्शन अतिशय मनोहारी आहे. कविवर्यांनी हे गाणे, पुणे स्टेशनवर आपल्या नवविवाहित मुलीला निरोप देणाऱ्या आईच्या तोंडचे 'दिल्याघरी तू सुखी रहा' हे वाक्य ऐकून लिहिले होते असे त्यांनीच सांगितले आहे. लहानपणी आपल्याला अतिशय आवडलेले अमूक गाणे कवी पी. सावळाराम यांनी लिहिले आहे हे आपल्याला माहीतही नसते. मात्र त्यांच्या गाण्यांनी जसे अनेक पिढ्यांना उच्च दर्जाचे मनोरंजन दिले तसेच कुटुंबसंस्थेच्या लोभस धाग्यांचे वर्णन करून चांगले संस्कारही केले हे त्यांची निवडक गाणी पाहिली की सहज पटते. 'जिथे सागरा धरणी मिळते तिथे तुझी मी वाट पाहते', 'यश हे अमृत झाले, (पुत्र व्हावा ऐसा), 'कोकीळ कुहूकुहू बोले, तू माझा तुझी मी झाले', 'माझिया नयनांच्या कोंदणी, उमलते शुक्राची चांदणी, 'लेक लाडकी या घरची' (कन्यादान), 'गोडगोजिरी लाजलाजरी ताई तू होणार नवरी (धर्मकन्या), 'आली हासत पहिली रात' (शिकलेली बायको), 'गंध फुलांचा गेला सांगून,' (भालू), 'कुणी न मालक, कुणी न सेवक, जनता तेथे राज्य करी' (मायमाऊली), 'तुजसाठी शंकरा भिल्लीण मी झाले, (चिमुकला पाहुणा), 'देव जरी मज कधी भेटला' (मोलकरीण), 'कल्पवृक्ष कन्येसाठी लावूनिया बाबा गेला', 'घट डोईवर, घट कमरेवर', 'जो आवडतो सर्वांना, तोचि आवडे देवाला', 'तूच कर्ता आणि करविता, मी शरण तुला भगवंता', 'मानसीचा चित्रकार तो', 'मुली तू आलीस आपुल्या घरी', 'रघुपती राघव गजरी गजरी, तोडीत बोरे शबरी', 'राधा कृष्णावरी भाळली', 'रिमझिम पाऊस पडे सारखा यमुनेलाही पूर चढे,' 'विठ्ठल तो आला आला मला भेटण्याला', 'असावे घर ते आपुले छान', 'ज्ञानदेव बाळ माझा सांगे गीता भगवंता' ही गाणी महाराष्ट्राच्या मनात कोरलेली आहेत. पी. सावळाराम यांना 'जनकवी' हा किताब 'ज्ञानपीठ पुरस्कार' विजेते कुसुमाग्रज यांनी दिला होता. त्यावरून त्याच नावाचा एक पुरस्कार दरवर्षी दिला जातो. यापूर्वी तो इसाक मुजावर, श्रीधर फडके, यशवंत देव, लीना भागवत, मधुराणी गोखले-प्रभुलकर, शिवाजी साटम, उदय सबनीस, सुरेश वाडकर यांना दिला गेला आहे. पी. सावळाराम यांच्या गीतलेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कुटुंबातील प्रेमाची नातीगोती चित्रित करणारी, धार्मिक भावना जपणारी, भक्तिरसात न्हालेली गाणी लिहिली. ती त्यावेळच्या कुटुंबवत्सल, पापभिरू समाजाला खूप भावली. कविवर्यांनी एक गाणे १९६७ साली आलेल्या श्रीकांत सुतार यांच्या 'सुखी संसार' या चित्रपटासाठी लिहिले होते. यशवंत देवांच्या संगीत दिग्दर्शनातले सुधीर फडके यांनी ते गायले. चित्रपटात होते सुलोचना लाटकर, सीमा देव आणि रमेश देव. युगानुयुगे सुरू असलेले ह्या जगदव्याळ विश्वाचे सूत्रबद्ध व्यवहार कसे अव्याहतपणे सुरू आहेत ते पाहिले की सामान्य माणसाला नेहमीच आश्चर्य वाटत आले आहे. काहींनी त्याचा विचार वैज्ञानिक पद्धतीने तर काहींनी प्रामाणिक श्रद्धा ठेवून केला. पी. सावळाराम यांनी साध्यासरळ सुसंस्कारी, सश्रद्ध भारतीय माणसाच्या दृष्टीतून याचे वर्णन आपल्या गीतात केले होते.

शब्द होते - "सारी भगवंताची करणी अधांतरी हे झुले नभांगण, शेषफणावर धरणी." संताच्या श्रद्धेप्रमाणे कवी म्हणतात, जो तो त्याच्या पूर्वसुकृताप्रमाणे जीवनाचा उपभोग तरी घेत असतो किंवा आपले भोग भोगत असतो! मात्र परमेश्वराला त्याची सर्वच लेकरे प्रिय असतात. तो श्रीमंतांना अभिमानास्पद असे महाल बांधून देतो तरी गरिबाच्या झोपडीतही वास करतो. जे पापात बुडाले आहे त्यांच्या उद्धारासाठी त्यांच्याबरोबर अनवाणीही चालतो. 'लक्ष्मीसाठी घर गर्वाचे उंच बांधुनि देतो, गरिबासाठी गरीब होऊन झोपडीतही रमतो, पतिता संगे पतीतपावन चालतसे अनवाणी.' वरून दिसणारे सत्य आणि प्रत्यक्षातले वास्तव यातील गंमतीशीर भेद सांगताना कवी म्हणतात, आपण समुद्राला सर्वात मोठा जलनिधी म्हणतो. पण माणसाची तहान भागवण्यासाठी त्याचा काहीही उपयोग होत नाही. माणसाची तहान भागवायला, त्याला जिवंत ठेवायला, आकाशातून पडणारे पाणीच लागते. जीवसृष्टीला आवश्यक असे अन्न आपण कवडीमोल समजतो त्या मातीतूनच वर येते. त्याला आपण 'अन्नब्रम्ह' म्हणतो. केवळ माणसासाठीच नव्हे तर अवघ्या जीवसृष्टीसाठी इतके योजनाबद्ध जग निर्माण करणाऱ्या परमेश्वराचे आपण ऋण मानले पाहिजेत. त्याच्याशी कृतज्ञ राहिले पाहिजे. कवी म्हणतात, 'प्रभूच्या चरणी भक्ती अर्पण करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.' 'समुद्रात जरी अथांग पाणी, तहान शमवी श्रावणधार, अन्न ब्रम्ह ते अखंड घेते, काळ्या मातीतून अवतार, जगण्यासाठी तरी मानवा, लाग प्रभूच्या चरणी.' श्रीमद भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णाचे एक वचन आहे, ते म्हणतात, 'मी सर्व सृष्टीत, प्राणीमात्रात समावलेलो आहे.' (गीता अध्याय ६/२९,३०, १०/२०, १५/१५, १८/६१) संतानी अशा श्लोकांचा अर्थ लावताना त्याला मोठे रंजक रूप दिलेले आहे. तसेच कवी म्हणतात, 'जिथे जिथे पायातला घुंगुरवाळा वाजतो आहे, जिथे एखादे बालक रांगते आहे, तिथे देव आहेच, जो स्वत: जगाचा मायबाप तो आईचे प्रेमळ वात्सल्य अनुभवण्यासाठी कौसल्या, देवकी किंवा तशाच कुणा स्त्रीच्या पोटी जन्म घेतो. मानवी देह धारण केल्यावर या जगाचे सर्व नियमही पाळतो. आपल्या मातेला ईश्वराचे प्रतिरूप मानून तिला वंदनही करतो. 'जिथे वाजतो घुंगुरवाळा, बालक होऊन तिथे रांगतो, मायबाप तो सर्व जगाचा आईसाठी जगात येतो, हात जोडुनी देव बोलतो शरण तुला गे जननी. सारी भगवंताची करणी...' अनेकदा गूढ तत्त्वज्ञानापेक्षा अशी साधीसरळ, भावुक गाणी मनाला केवढी शांती आणि आजच्या जगातले हरवलेले समाधान परत मिळवून देतात!

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायालय अंतर्गत)

# मी जवळून पाहिलेले आमदार - सुरेश धस



**तो काळ आठवला तरी आजही अंगावर काटा उभा राहतो, काळजात कालवाकालव होते...**

**साधारण २००५-२००६ चा तो काळ. राजकारणात मोठी उलथापालथ चालू होती. आमदार सुरेश आण्णा धस यांनी नुकताच भाजपचा हात सोडून राष्ट्रवादीचा झेंडा हाती घेतला होता. त्यांच्या राजकीय जीवनातला तो कसोटीचा काळ होता. जुने, जीवाला जीव देणारे म्हणवणारे अनेक विश्वासू सहकारीही साथ सोडून गेले होते. एकाकी पण लढाऊ बाणा घेऊन आण्णा उभे होते.आणि नेमक्या त्याच काळात माझ्या आयुष्यातला, आमच्या कुटुंबाच्या इतिहासातला सर्वात काळा दिवस उगवला.**

मी तेव्हा नुकताच दहावीची पायरी ओलांडून अकरावीत पाऊल ठेवलं होतं. स्वप्नं डोळ्यात होती, पण पाय मात्र जमिनीवर. सप्टेंबर महिना. सर्वत्र गणेशोत्सवाची धामधूम, ढोल-ताशांचा गजर, आणि शेतात ज्वारीच्या पेरणीची लगबग.१४ सप्टेंबर २००५, वार बुधवार. ही तारीख माझ्या काळजावर कायमची कोरली गेली आहे.त्या दिवशी सकाळी माझे वडील नेहमीप्रमाणे शेतात ज्वारीची पेरणी करत होते. घामाने चिंब झालेले शरीर, काळ्या मातीशी नातं सांगणारे हात.अचानक त्यांच्या छातीत तीव्र कळ आली, जणू काळानेच छातीत चमक मारावी. माझे वडील मुळातच अत्यंत भोळ्या, घाबरट आणि हळव्या मनाचे. दुखणं लपवणं त्यांच्या स्वभावातच नव्हतं.आमच्या गावात तेव्हा साधा दवाखानाही नव्हता. आमचं सर्वस्व असलेली बाजारपेठ म्हणजे करंजी घाट, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर. वडील कसेतरी करंजी घाटातील डॉ. पालवे यांच्याकडे पोहोचले. डॉक्टरांनी तपासणी केली आणि त्यांच्या चेहऱ्यावरची गंभीरता पाहून आमच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांनी एक चिठ्ठी हातात ठेवली - अहिल्यानगरचे नामांकित हृदयरोग तज्ज्ञ डॉ. सानप यांची. म्हणाले, "एक क्षणही वाया घालवू नका, तात्काळ नगरला जा."

दुसऱ्या दिवशी वडील आणि माझे आजोबा पहाटेच नगरला रवाना झाले. डॉ. सानप यांनी सर्व तपासण्या केल्या. मशीनच्या बीपचा आवाज काळजाचा ठोका चुकवत होता. तपासणी संपल्यावर डॉक्टरांनी जे वाक्य उच्चारले, ते शब्द नव्हते, तर आमच्या सुखी संसारावर पडलेली वीजच होती.

"तुमच्या हृदयाच्या दोन्ही झडपा - दोन्ही वाल्व्ह निकामी झाल्या आहेत. तात्काळ शस्त्रक्रिया करावी लागेल. खर्च येईल... चार ते पाच लाख रुपये."चार ते पाच लाख! आज हे ऐकून धक्का बसतो, तर वीस वर्षांपूर्वी त्याची किंमत आजच्या वीस लाखांपेक्षाही कितीतरी अधिक होती. आमची परिस्थिती तेव्हा अत्यंत हलाखीची, हातातोंडाशी गाठ असलेली. डॉक्टरांचे हे शब्द कानावर पडताच वडिलांच्या पायाखालची वाळूच सरकली. चेहरा पांढराफटक पडला. काय करावे, कुठे जावे, काहीच सुचेना. वडील विचारांच्या महासागरात बुडालेले असतानाच डॉक्टरांचा दुसरा बॉम्ब फुटला.

"तुम्हाला आज, आत्ताच्या आत्ता येथे भरती व्हावे लागेल. जर आज भरती झाला नाहीत, तर समजा... तुमच्या आयुष्यातले फक्त दोनच दिवस शिल्लक आहेत."हे सांगताना डॉक्टरांनी आपल्या उजव्या हाताची दोन बोटे वर केली. काळाने जणू दोन दिवसांची नोटीसच दिली होती.आणि येथेच नियतीने एक हृदयद्रावक प्रसंग घडवला. माझ्या आजोबांना पूर्वापारपासून कमी ऐकू येत असे. डॉक्टर आणि वडिलांमध्ये काय गंभीर चर्चा चालली आहे हे त्यांना कळत नव्हते. पण डॉक्टरांनी दाखवलेली दोन बोटे त्यांनी पाहिली. त्यांच्या भोळ्या मनाने त्याचा अर्थ लावला - दोन हजार रुपये. ते कळवळून डॉक्टरांना म्हणाले, "डाक्टरसाहेब, तुम्ही काळजी करू नका. आम्ही दोन हजार रुपये कुठूनही करून आणतो, पण माझ्या पोराला बरं करा, माझ्या पोराला वाचवा..."त्या बापाच्या आर्त हाकेकडे डॉक्टरांनी दुर्लक्ष केले. ते पुन्हा वडिलांना म्हणाले, "वेळ घालवू नका, आत्ताच्या आत्ता ऍडमिट व्हा."

पण खिशात दमडी नसताना ऍडमिट व्हायचे कसे? वडील रिकाम्या हाताने, पण डोंगराएवढे दुःख घेऊन, सायंकाळी पाचच्या एसटीने घरी परतले.आणि घरी बातमी समजताच... जसा आभाळातून अचानक वीज कोसळावी आणि होत्याचे नव्हते व्हावे, तसे आमच्या काळजात 'धस्स' झाले. घरावर शोककळा पसरली. पाच लाख रुपये कुठून आणायचे? हा यक्षप्रश्न नव्हता, तर आमच्या अस्तित्वावरच घाला होता.तेव्हाच खऱ्या अर्थाने कळले - सुखात तर सारी दुनिया सोबत असते, पण दुःखात आपली सावलीही साथ सोडते. जो दुःखात खांद्याला खांदा लावून उभा राहतो, तोच खरा रक्ताचा नसला तरी रक्तापेक्षा जवळचा सोयरा. अशा अंधारात आम्हाला दोन दीपस्तंभांनी आधार दिला. एक म्हणजे आमच्या देऊळगाव घाट, ता. आष्टी, जि. बीड गावचे तत्कालीन प्रथम नागरिक, सरपंच संभाजी म्हस्के आणि संपूर्ण म्हस्के कुटुंब. आणि दुसरे म्हणजे घाटशिरस, ता. पाथर्डी येथील पाठक कुटुंब. त्यांनी आम्हाला पोटाशी धरलं, म्हणाले, "घाबरू नका. सर्व ठीक होईल. आपण आण्णांकडे जाऊ.""सुरेश आण्णा धस" - हे नाव मी तेव्हा पहिल्यांदा ऐकले. गावोगावी एकच चर्चा होती

"आण्णांच्या दरबारात जो कोणी गाऱ्हाणं घेऊन जातो, तो कधीही रिकाम्या हाताने परत येत नाही."

तिसऱ्याच दिवशी आम्ही आशेचा एकमेव किरण घेऊन आण्णांच्या दारात पोहोचलो. सरपंचांनी थरथरत्या आवाजात सर्व हकीकत सांगितली. गर्दी होती, लोकांची रीघ लागली होती, पण आण्णांनी आमचं ऐकलं. आणि पुढे जे घडले ते आजही डोळ्यात पाणी आणते. आण्णांनी एका क्षणाचाही, एका श्वासाचाही विचार केला नाही. त्यांनी आपले स्वीय सहाय्यक असलेले पवार साहेबांना सांगितले, "यांना आमदार फंडातून पाच लाख रुपयांचे पत्र तात्काळ देऊन टाका."क्षणात पाच लाखांचे पत्र आमच्या हातात होते. ते पत्र नव्हते, तर माझ्या वडिलांच्या प्राणांची संजीवनी होती, आमच्या कुटुंबाच्या पुनर्जन्माची नवी पहाट होती.त्या पत्रामुळे माझ्या वडिलांवर अहिल्यानगरच्या आनंद ऋषी हॉस्पिटलमध्ये मोफत, यशस्वी शस्त्रक्रिया झाली. ज्या डॉक्टरांनी फक्त दोन दिवसांची मुदत दिली होती, तेच माझे वडील त्या पत्रामुळे, त्या एका माणसाच्या माणुसकीमुळे पुढे तब्बल १७ वर्षे आनंदाने, ठणठणीत जगले.होय, १७ वर्षांचे बोनस आयुष्य! ते फक्त आणि फक्त एकाच नावामुळे मिळाले - आमदार ....सुरेश रामचंद्र धस...

आमचे ठोंबरे कुटुंब हे उपकार सात जन्मातही विसरू शकणार नाही. कारण माझ्या वडिलांचा प्रत्येक श्वास, त्यांनी पाहिलेले माझ्या संसाराचे प्रत्येक सुख, हे आण्णांनी दिलेले दान होते.

पुढे दुसऱ्या कोविडच्या काळात, २७ डिसेंबर २०२१ रोजी नियतीने माझ्या वडिलांना आमच्यापासून हिरावून नेले. पण त्या महामारीच्या काळातही धस पिता-पुत्रांनी आमच्या कुटुंबाला मायेचा हात दिला, मदतीचा हात पुढे केला.

म्हणूनच मित्रांनो, आज जर कोणी मला विचारले, "अरे आदिनाथ, तू देव पाहिला आहेस का?"तर माझे उत्तर एकच असेल, आणि ठाम असेल, काळजापासून असेल -."मित्रा, मी देव पाहिला नाही. पण माणसातला चालता-बोलता देव माणूस मी पाहिला आहे... आणि तो देव माणूस म्हणजे आमचे सुरेश आण्णा धस!"

आज वडीलांना जाऊन जवळजवळ पाच वर्षे होत आली, पण त्या उपकाराची, त्या माणुसकीची आठवण आजही ताजी आहे, जशी कालच घडली असावी...



**लेखन - आदिनाथ ठोंबरे.**
**देऊळगाव घाट.ता.आष्टी.जि.बीड.**

---

# परळीचा सुपुत्र विवेक कांबळे याच्या जिद्दीला यश; आयआयटी धारवाड येथे संगणक अभियांत्रिकीसाठी (CSE) निवड

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

केवळ जिद्द, कठोर मेहनत आणि कौटुंबिक संस्कारांच्या बळावर परळीच्या भूमिपुत्राने राष्ट्रीय पातळीवर दैदिप्यमान यश संपादन केले आहे. येथील सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या कांबळे परिवारातील सुपुत्र विवेक विजय कांबळे याची `आयआयटी धारवाड` (कर्नाटक) येथे बी.टेक. संगणक अभियांत्रिकी (Computer Science & Engineering) या अत्यंत मानाच्या शाखेत निवड झाली आहे. त्याच्या या यशाने संपूर्ण परळी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

■ **स्वाध्याय आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर यश**

विवेकने आपले प्राथमिक ते १२ वी पर्यंतचे शिक्षण परळी शहरातच पूर्ण केले. कोणत्याही महागड्या खासगी कोचिंग क्लासेसचा आधार न घेता, केवळ स्वाध्याय, सखोल अभ्यास आणि सातत्यपूर्ण सरावावर भर देत त्याने हे अभूतपूर्व यश खेचून आणले आहे.

देशातील अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या `जेईई मेन` (JEE Main) परीक्षेत विवेकने ८८.०७



पर्सेन्टाईल गुण मिळवून अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातून १०,४२८ वा राष्ट्रीय क्रमांक पटकावला होता. या उत्कृष्ट गुणवत्तेच्या व `जेईई ॲडव्हान्स`मधील यशाच्या बळावर त्याला देशातील सर्वोच्च शिक्षण संस्थांपैकी एक असलेल्या आयआयटी धारवाड मध्ये प्रवेश मिळाला आहे. ग्रामीण व निमशहरी भागातून थेट आयआयटीपर्यंत मजल मारणारा विवेक हा भागातील इतर विद्यार्थ्यांसाठी एक आदर्श प्रेरणास्थान ठरला आहे.

■ **सुशिक्षित व सामाजिक परंपरेचा वारसा**

कांबळे कुटुंब हे परळीतील एक अत्यंत सुशिक्षित, सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रात नावाजलेले घराणे मानले जाते. विवेकच्या या यशामागे संपूर्ण कुटुंबाचे प्रोत्साहन व खंबीर पाठबळ लाभले आहे. राष्ट्रपाल कांबळे, जयवर्धनी विजय कांबळे, जयपाल कांबळे तसेच आजी अहिल्याबाई प्रभाकर कांबळे यांच्यासह सर्व कौटुंबिक सदस्यांच्या त्यागाचे आणि मार्गदर्शनाचे हे फलित असल्याचे बोलले जात आहे.

■ **परळी शहरातून कौतुकाचा वर्षाव**

विवेकच्या या ऐतिहासिक यशाबद्दल कांबळे परिवारावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा आणि पुष्पांचा वर्षाव होत आहे. लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच विविध सामाजिक संघटनांच्या मान्यवरांनी कांबळे परिवाराची भेट घेऊन विवेकचे कौतुक केले व पुढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

विवेक कांबळे याने मिळवलेल्या या यशामुळे परळीच्या वैभवात भर पडली असून, आज संपूर्ण तालुक्यात कांबळे परिवाराचे नाव अभिमानाने घेतले जात आहे.

---

# कपिल आवाड यांची मा.ह. अभियान सोशल मीडिया माजलगाव तालुका अध्यक्ष पदी तर सुमित आवाड यांची मा. ह. विद्यार्थी आघाडी माजलगाव तालुका अध्यक्ष पदी निवड



नित्रुड | येथे आज प्रा.डॉ.मिलिंद नाना आवाड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मा. ह. अभियान चे जिल्हाध्यक्ष बप्पा मुजमुले यांच्या उपस्थितीत कपिल आवाड यांची मा.ह. अभियान सोशल मीडिया माजलगाव तालुका अध्यक्ष पदी तर सुमित आवाड यांची मा. ह. विद्यार्थी आघाडी माजलगाव तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली.

युवा पिढीने संघटनेमध्ये येऊन आपल्या युवा ऊर्जेने संघटना वाढवावी या उद्देशाने ही निवड करण्यात आली. आणि हे दोन्ही ही तरुण संघटना वाढीसाठी विशेष कार्य करतील असा विश्वास मत विष्णू बप्पा मुजमुले यांनी व्यक्त केला .

यावेळी मा.ह.अभियान प्रणित ऊ. का. संघटनेचे जिल्हा सचिव तुळशीराम भाऊ आवाड ,सा. ग्रंथालय सचिव पी.एस. आवाड, सर्कल अध्यक्ष कीट्टी आडगाव अशोक थोरात, समन्वयक प्रकाश थोरात , सर्जेराव तांबे, बाळू आवाड, विखार शेख,माउली जाधव, बाबा मेंडके, आदित्य जाधव, रमेश आवाड, अमर गायकवाड आदी उपस्थित होते. मानवी हक्क अभियान संघटना वाढीसाठी जीवाचे रान करून प्रयत्न करू असे मत दोन्ही तालुका अध्यक्ष कपिल आवाड आणि सुमित आवाड यांनी व्यक्त केले.

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड, मंगळवार,11 ऑगस्ट 2026




# परळीत उपवर्गीकरण विरोधी महामोर्चाचा एल्गार !

## SC उपवर्गीकरणाविरोधात परळीत ऐतिहासिक महामोर्चा

### "९० टक्के मातंग समाज आमच्यासोबत; हिवाळी अधिवेशनाला घेराव घालू" – उपवर्गीकरण विरोधी महामोर्चात आनंदराज आंबेडकर आक्रमक

### "सरकारने फूट पाडण्याचे षडयंत्र थांबवावे" – बबनराव घोलप

### "उपवर्गीकरणावर मुंडे बहिण-भावाने भूमिका स्पष्ट करावी- रोहिदास बनसोडे यांची परळीतील मोर्चातून मागणी"

### परळीत उपवर्गीकरण विरोधी महामोर्चाला जनसागर ५९ जातींचे ऐक्य दाखवत प्रशासनाला दिले निवेदन

### उपवर्गीकरणाविरोधात परळीत 'महामोर्चा' ५९ जातींच्या ऐक्याचा एल्गार



**परळी | विशेष प्रतिनिधी**

"विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान राष्ट्राला अर्पण करताना अनुसूचित जातीला कलम ३४१ नुसार एकत्र ठेवले आहे. महाराष्ट्रात ५९ जाती गुण्यागोविंदाने नांदत असताना सरकारने जाती-जातीत भांडण लावण्याचा उद्योग करू नये, अन्यथा गाठ आमच्याशी आहे," असा सज्जड इशारा रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांनी दिला.

महाराष्ट्र शासन अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरणाच्या नावाखाली फूट पाडण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत, या विरोधात १० ऑगस्ट रोजी परळी येथे ऐतिहासिक भव्य महामोर्चा काढण्यात आला. या मोर्चात हजारोंच्या संख्येने आंबेडकरी समाज रस्त्यावर उतरला होता.

सभेला संबोधित करताना आनंदराज आंबेडकर म्हणाले, "उपवर्गीकरणाच्या विरोधात राज्यभरात ५९ जातींचे मोर्चे निघत आहेत आणि याचा सरकारवर परिणाम होत आहे. हे मोर्चे हिवाळी अधिवेशनापर्यंत चालू राहतील. सरकारने ऐकले नाही तर अधिवेशनाला घेराव घालू. ९० टक्के मातंग समाज आमच्यासोबत आहे." तसेच, "हे अल्पसंख्याक सरकार बहुजन एकत्र येण्याला घाबरत असून उपवर्गीकरणाचा डाव आखत आहे," असा घणाघात त्यांनी केला.

अ‍ॅड. अमन आनंदराज आंबेडकर यांनी आपल्या भाषणात, "आम्ही बाबासाहेबांचे वाघ आहोत. ५९ जातींची ही एकी आगामी निवडणुकीपर्यंत अशीच कायम ठेवा," असे आवाहन केले.





"वर्गीकरणाची मागणी कुणीही केलेली नसताना सरकार षडयंत्र रचत आहे." **बबनराव घोलप (राष्ट्रीय अध्यक्ष, चर्मकार महासंघ)**

मातंग समाजाच्या वतीने **लक्ष्मण शिंदे व संदीप मस्के** यांनी मातंग समाजाच्या वतीने तन-मन-धनाने अनुसूचित जातीचे ऐक्य टिकवण्यासाठी बौद्ध समाजासोबत असल्याचे जाहीर केले.

## शिस्तबद्ध मोर्चा आणि जनसागर

मोर्चाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मोर्चा बस स्थानक रोड, रेल्वे स्टेशन, एकमिनार चौक, उड्डाणपूल, फुलेनगर, सिद्धार्थनगर, भिमवाडी मार्गे मोंढा मार्केट येथील मैदानावर पोहोचला.

'जय भीम', 'भारतीय संविधान जिंदाबाद', 'आरक्षण उपवर्गीकरण रद्द करा', आणि 'अनंत बदर समिती बरखास्त करा' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. सभेपूर्वी समता सैनिक दलाच्या वतीने आनंदराज आंबेडकर यांना सलामी देण्यात आली.

सभेचे प्रास्ताविक विद्यार्थिनी श्रद्धा सूर्यवंशी हिने केले, तर प्रतीक्षा उजगरे हिने धडाकेबाज भाषण करून उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. माधव रोडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी मुलींच्या हस्ते तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले तसेच आनंदराज आंबेडकर व बबनराव घोलप यांना भारतीय संविधान भेट देऊन सत्कार करण्यात आला.



**"अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण करून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला जात आहे. या अत्यंत संवेदनशील मुद्द्यावर महायुती सरकारमधील मंत्री आणि लोकप्रतिनिधी गप्प का आहेत? पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे आणि माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी अनुसूचित जातीच्या या उपवर्गीकरणाबाबत आपली अधिकृत भूमिका तातडीने स्पष्ट करावी, ही आमची ठाम मागणी आहे."** - रोहिदास बनसोडे